| MHRT070008922024 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५८६/२०२४**<br>**महाराष्ट्र सरकार वि. सुमित अविनाश झिंगे**<br>**निशाणी ६ लगत** |
|---|---|

## –: न्या य नि र्ण य :–

*(निकाल घोषित दि.०५.०५.२०२६)*

सरकार पक्षाने सदर खटला आरोपी विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अंतर्गत दाखल केला आहे.

२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम निर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे–

| अ.क्र | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष असे सिध्द करतो काय की, दि.०५.०८.२०२४ रोजी १८.५५ वा.चे सुमारास निवळी, कोष्टेवाडी, ता.चिपळूण येथे आरोपी त्याच्या ताब्यामध्ये गैरकायदा बिगर परवाना ७५० मिली मापाच्या गोल्डन ॲश व्हिस्की कंपनीच्या ५ सिलबंद विदेशी मद्याच्या बाटल्या, १८० मिली मापाच्या गोल्डन ॲश व्हिस्की कंपनीच्या ४४ सिलबंद विदेशी मद्याच्या बाटल्या, एका २० मापाच्या प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लि. गावठी हातभट्टीची दारू असा मुद्देमाल बाळगल्या स्थितीत मिळून आला व मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | काय आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

### का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.०१ बाबत –**

०३. आरोपीविरूध्द वरील गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षातर्फे पंच **साक्षीदार क्र.१ म्हणून योगेश हरिश्चंद्र राजेशिर्के** यांना तपासले आहे. सदर पंच साक्षीदारांनी त्यांचेसमक्ष पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, असे कथन केले आहे. अभियोगपक्षाने विचारलेले सुचक प्रश्नांस त्यांनी आरोपीच्या ताब्यात गावठी हातभट्टीची दारू मिळून आल्याचा तो पंचनामा होता हे नाकारले. यावरून

आरोपविरूध्द अभियोगपक्षास सहायभूत ठरणारे कथन अभिलेखावर येत नाही. या साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणताही साक्षीदार अभियोगपक्षाने तपासला नाही. यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविणे न्यायसंगत वाटत नाही.

०४. अभियोगपक्षाने प्रस्तुत केसचे कामी तक्रारदार, तपासी अंमलदार, नमुना वाहक व अन्य प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांना तपासले नाही. पंच साक्षीदारांनी पंचनाम्यातील मजकूर नाकारल्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा शाबीत करण्यास अपयशी ठरलेला आहे. अभियोग पक्षाने प्रस्तुत केसचे कामी रासायनिक विष्लेष्णाचा अहवाल सादर केला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात मिळून आलेला द्रव्य पदार्थ हा गावठी हातभट्टी दारू बाबतचाच आहे किंवा कसे हे स्पष्ट होत नाही.

०५. अभियोगपक्षाचे केसला पंच साक्षीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची जोड नाही. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदाराच्या अभावी व तपासी अधिकारी यांचे पुराव्याअभावी प्रस्तुतचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला होता किंवा कसे हे शाबीत होत नाही. एकंदरीत अभियोगपक्षाने आरोपीवरील गुन्हा संशयापलिकडे जावून शाबीत केलेला नाही. त्यामुळे आरोपीला संशयाचा फायदा देवून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१) आरोपीची **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २८१** नुसार मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५(ई) खालील दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचा जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

३) जप्त मुद्देमाल अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४) आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ प्रमाणे वैयक्तीक जातमुचलका व जामीनकदबा रक्कम रू.५०,०००/– चा द्यावयाचा आहे

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) POWAR KEDAR ARVIND

Digitally signed by POWAR KEDAR ARVIND
Date: 2026.05.05 17:51:36 +0530

ठिकाण – चिपळुण
दिनांक – ०५.०५.२०२६

**(के. ए. पोवार)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चिपळुण

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | **Mr. S. J. Thorat** |
| Name of Court | **C.J.J.D. & J.M.F.C., Chiplun.** |
| Date of publish | 05.05.2026 |
| Order Signed by the P.O. on | 05.05.2026 |
| Order Uploaded on | 05.05.2026 |